मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com
पुणे, पिंपरी–चिंचवड
शनिवार, दि. 2 ऑगस्ट 2025 | पान- 1

# घरबसल्या भरा पिंपरी चिंचवड महापालिकेचा मालमत्ता कर!

## ऑनलाइन कर भरण्यासाठी नोंदणीकृत मोबाईलवर महापालिकेकडून संदेश

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील नागरिकांना घरबसल्या जास्तीत जास्त सुविधा देण्याचा महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाचा प्रयत्न असतो. त्या अनुषंगाने कर संकलन विभागाकडून मालमत्ताधारकांना ऑनलाईन मालमत्ता कर भरण्याची सुविधा देण्यात आली आहे.

नागरिकांना मोबाईलवरून कुठेही असताना कर भरण्यासाठी त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर कस्टमाइज्ड पेमेंट लिंक असणारा संदेश महापालिकेकडून पाठवण्यात येत आहे. या लिंकवर क्लिक केले की नागरिकांना त्यांच्या मालमत्तेचे बिल दिसते, त्यानंतर नागरिक खातरजमा करुन कर भरू शकतात. परंतु ऑनलाइन कर भरताना नागरिकांनी ज्या संकेतस्थळावर कर भरत आहोत ते महापालिकेचे अधिकृत संकेतस्थळ असल्याची खात्री करावी.




शहरात एकूण ७ लाख ३१ हजार मिळकतींची नोंद आहे. कर संकलन विभागाच्या अनेक सेवा ऑनलाइन झाल्यामुळे, ज्या नागरिकांनी अद्यापही मालमत्ता बिलाशी मोबाईल क्रमांक जोडलेले नाहीत, त्यांनी तात्काळ जोडावेत. त्यानंतर सर्व सेवांचा लाभ घरबसल्या घेता येणार आहे, अशी माहिती कर संकलन विभागाचे सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांनी केले आहे. सध्या ऑनलाइन मालमत्ता कर भरणाऱ्यांना सामान्य करात चार टक्क्यांची सवलत देण्यात येत आहे. तरी जास्तीतजास्त नागरिकांनी या सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

> “ पिंपरी चिंचवड महापालिकेचा मुख्य उद्देश म्हणजे नागरिकांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सोप्या व जलद सेवा देणे, हा आहे. नागरिकांना ऑनलाइन कर भरण्याच्या सुविधेचा लाभ घेतल्यामुळे नागरिकांचा वेळ वाचवणार आहे. भविष्यात अशीच आणखी सुलभ सेवा देण्याचा आमचा प्रयत्न राहील.
>
> **- प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

### कर संकलन विभागाच्या ऑनलाइन सेवा

- कर भरणा
- मालमत्ता हस्तांतर
- मालमत्ता कर सवलत योजना
- थकबाकी नसल्याचा दाखला

# पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शाळांमध्ये ‘स्पंदन’ उपक्रमाची सुरुवात!

## शिक्षण विश्व: 60 हजाराहून अधिक विद्यार्थ्यांना जीवन कौशल्य शिक्षणाचा लाभ मिळणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांमध्ये मूलभूत कौशल्यांचा विकास व्हावा यासाठी 'स्पंदन' उपक्रम सुरू केला आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हा उपक्रम यशस्वी ठरण्याच्या दृष्टीने नियोजनही करण्यात आले आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांमध्ये विचारशक्ती आणि निर्णय क्षमतेसारखी मूलभूत जीवन कौशल्य प्रमाण जाणून घेण्यासाठी ‘क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडिया’ (क्यूसीआय) द्वारे मूल्यमापन करण्यात आले. या मूल्यमापनातून असे दिसून आले की, महापालिकेच्या केवळ १२ टक्के विद्यार्थ्यांनी निर्णय घेण्याशी संबंधित प्रश्नांची योग्य उत्तरे दिली. तर ४२ टक्के पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना स्व-जागरूकता, गंभीर विचार आणि निर्णय घेणे यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये उत्तरे देण्यात अडचणी आल्या. यामुळेच महापालिकेच्या शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांमध्ये मूलभूत कौशल्यांचा विकास व्हावा यासाठी 'स्पंदन' सारखा उपक्रम सुरू केला आहे.



या उपक्रम वाचन आणि गणिताबरोबरच मुलांचा भावनिक विकास करण्यावर लक्ष केंद्रित करतो. 'स्पंदन' उपक्रम सर्व १४० महापालिका शाळा आणि २११ बालवाड्यांमध्ये सुरू करण्यात येत आहे, ज्यामुळे पूर्व-प्राथमिक ते इयत्ता १० वी पर्यंतच्या ६० हजाराहून अधिक विद्यार्थ्यांना लाभ मिळणार आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये ‘सामाजिक-भावनिक आणि नैतिक शिक्षण व जीवन कौशल्यांची रुची वाढेल’ असे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

> “ आम्ही अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मॉडेल्स पाहिली आणि आमच्या मुलांच्या वास्तवाला अनुकूल असलेले सर्वोत्तम उपक्रम राबवत आहोत. स्पंदन ही दीर्घकालीन व पिंपरी चिंचवडच्या भविष्याची गुंतवणूक आहे. केवळ शिक्षणातच नाही, तर आपण ज्या प्रकारचा समाज निर्माण करू इच्छितो त्यासाठी हा उपक्रम यशस्वी ठरणार आहे.
>
> **- प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

### स्पंदन उपक्रमासाठी 21 शिक्षकांची निवड!

**विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवण्यासाठी महापालिकेने सहानुभूती, संवाद कौशल्य, विचारपूर्वक निर्णय क्षमता आणि समग्र शिक्षणाची जाणीव अशा महत्त्वाच्या गुणांवर लक्ष केंद्रित करत २१ शिक्षकांची निवड केली आहे. हे शिक्षक आता "एसईई लाईफ स्किल्स मास्टर ट्रेनर्स" म्हणून ओळखले जातात आणि ते इतर शिक्षकांना मार्गदर्शन करण्यासाठी विशेष प्रशिक्षण घेत आहेत.**

# पुण्यात बुजविले चक्क दहा हजाराहून अधिक खड्डे

## महापालिकेच्या पथ विभागाचा दावा; महापालिकेच्या कामाचा दर्जा पुन्हा एकदा समोर

**पुणे | प्रतिनिधी**

असमान रस्ते, रस्त्यांवरील खचलेली झाकणे, खड्डे चुकविताना होणारी वाहनचालकांची कसरत या समस्यांचा सामना नागरिकांना आजही करावा लागत असून, महापालिकेने मात्र एक एप्रिलपासून आतापर्यंत दहा हजारांहून अधिक खड्डे बुजविल्याचा दावा केला आहे. खड्ड्यांच्या दुरुस्तीसाठी महापालिकेच्या पथ विभागाने कनिष्ठ अभियंत्यांची नियुक्ती करून त्यांच्यावर कामाची जबाबदारी निश्चित केली असली, तरी अद्याप रस्त्यांवरील खड्ड्यांचे प्रमाण कायम असल्याचे चित्र आहे.




गेल्या चार दिवसांपासून शहरात कमी-अधिक प्रमाणात पडत असलेल्या पावसामुळे अनेक रस्त्यांवर खड्डे पडण्यास सुरुवात झाली असून, त्यामधून वाहने चालविताना नागरिकांची तारांबळ उडत असल्याची तक्रार नागरिक करीत आहेत. अनेक रस्त्यांवरील खड्डे दुरुस्त करण्यामध्ये महापालिकेला अपयश आल्याचा आरोप होत आहे. हे चित्र एकीकडे असताना एक एप्रिलपासून आतापर्यंत पथ विभागाने शहरातील १० हजारांपेक्षा अधिक खड्ड्यांची दुरुस्ती केल्याचा दावा केला आहे.

पावसाने उघडीप घेतल्यानंतर महापालिकेने खड्डे बुजविण्याचे काम हाती घेतले होते. त्यासाठी पथ विभागाने प्रत्येक महत्त्वाच्या रस्त्यासाठी अभियंत्याची नियुक्ती करून त्यावर जबाबदारी दिली होती. मात्र, गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे महापालिकेने बुजविलेले खड्डे पुन्हा उघडे पडले असून, त्यामधील खडी बाहेर येत आहे. काही ठिकाणी नव्याने खड्डे पडण्यास सुरुवात झाली आहे. यामुळे महापालिकेच्या कामाचा दर्जा पुन्हा एकदा समोर आला आहे.

रस्त्यावर खड्डे पडल्याची तक्रार महापालिकेकडे आल्यानंतर आणि पथ विभागातील अभियंत्यांना रस्त्यावर कुठे खड्डा पडल्याचे आढळल्यास तेथे दुरुस्तीचे काम केले जाते. महापालिकेच्या 'पीएमसी केअर' या ॲपबरोबर महापालिकेच्या कॉल सेंटरवर आलेल्या तक्रारींची दखल घेऊन ही खड्डे दुरुस्ती केली जाते. १ एप्रिलपासून आतापर्यंत १० हजार २६८ खड्डे पथ विभागाने बुजविले असून ११०४ चेंबरची दुरुस्ती करण्यात आली आहे, अशी माहिती पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी दिली. रस्त्यावर पडलेले खड्डे दुरुस्तीसाठी स्वतंत्र अभियंत्यांची नेमणूक करण्यात आली असून, त्यांच्याकडे जबाबदारी निश्चित करण्यात आल्याचे पावसकर यांनी सांगितले.

> “ रस्त्यावर खड्डा पडल्याची तक्रार आल्यानंतर १२ मीटर रुंदीच्या वरील रस्त्याची जबाबदारी पथ विभागाची आहे. तर, १२ मीटर पेक्षा कमी रुंदी असलेल्या रस्त्याची जबाबदारी संबंधित क्षेत्रीय कार्यालयांची आहे, असे उत्तर दिले जाते. यामुळे खड्डे दुरुस्तीसाठी विलंब होतो. या तक्रारी आल्यानंतर पथ आणि क्षेत्रीय कार्यालयातील अभियंता यांच्यावर संयुक्तिक जबाबदारी देण्यात आली आहे. यामध्ये दिरंगाई करणाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे.
>
> **– अनिरुद्ध पावसकर, मुख्य अभियंता, पथ विभाग, पुणे महापालिका.**

### 'दोन अभियंत्यांना कारणे दाखवा'

**» रस्त्यावर पडलेले खड्डे योग्य पद्धतीने दुरुस्त न केल्याने कोंढवा वानवडी क्षेत्रीय कार्यालयातील दोन अभियंत्यांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांच्याकडून खुलासा मागविण्यात आला आहे. गेल्या आठवड्यात कोंढवा भागातील खड्डा व्यवस्थित दुरुस्त न केल्याने ही नोटीस बजाविण्यात आली आहे. यामध्ये एका उपअभियंत्यासह एका कनिष्ठ अभियंत्याचा समावेश आहे. खड्डे दुरुस्तीचे काम सुरू असून यामध्ये दिरंगाई करणाऱ्यांवर कारवाई केली जात असल्याचे पावसकर यांनी स्पष्ट केले.**

---

# पीके चौकात भीषण अपघात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू

## वाहनचालकावर कारवाईची मागणी: माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांची तत्काळ मदत

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपळे सौदागरमधील पीके चौकात आज सकाळच्या सुमारास एक अत्यंत दुःखद आणि भीषण अपघात झाला. या अपघातात एक दुचाकीस्वार जागीच मृत्युमुखी पडला असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.




चिंचवड येथील रहिवासी असलेले एक व्यक्ती एक्टीवा स्कूटर (दुचाकी) वरून पीके चौकातून कोकणे चौकाच्या दिशेने जात असताना, अचानकपणे RMC (रेडी मिक्स कॉंक्रीट) वाहून नेणाऱ्या जड वाहनाच्या खाली आल्याने गंभीर अपघात झाला. अपघात इतका भीषण होता की संबंधित दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती समजताच माजी नगरसेवक विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी सांगवी पोलीस ठाणे, वाहतूक विभाग व एम्बुलन्स सेवा यांना त्वरित संपर्क साधून आवश्यक ती सर्व मदत पोहचवली. अपघात स्थळी गर्दी झाली होती, मात्र नाना काटे यांच्या तत्परतेमुळे परिस्थिती नियंत्रणात आली. यावेळी वाहतूक पोलिस निरीक्षक व सांगवी पोलीस ठाण्याचे निरीक्षक घटनास्थळी दाखल झाले. नगरसेवक नाना काटे यांनी या अपघाताबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत, जड वाहन चालकांच्या बेपर्वाईबद्दल निषेध केला. तसेच संबंधित वाहनचालकावर कठोर कारवाई करण्याचे निर्देश पोलीस अधिकाऱ्यांना दिले.

### सोसायटीधारकांमध्ये संतापाची भावना...

**» पिंपळे सौदागर आणि पुनावळे परिसरात मागील काही दिवसांत अवजड वाहनांमुळे होणाऱ्या अपघातांमध्ये चिंताजनक वाढ झाली आहे. अवघ्या दोन दिवसांपूर्वी पुनावळे येथे एका महिलेला ट्रकने चिरडल्याची दुर्दैवी घटना घडली. ती घटना ताजी असतानाच आज पिंपळे सौदागरमधील पीके चौकात RMC ट्रकने एका दुचाकीस्वाराचा जीव घेतल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या दोन्ही घटनांनी अवजड वाहनांची बेफिकीर वाहतूक आणि त्यावरील नियंत्रणाच्या अभावाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. शहरातील वाढती रहदारी, सकाळ-संध्याकाळच्या शालेय व ऑफिसच्या गर्दीतून नागरिकांना सुरक्षितपणे प्रवास करता यावा, यासाठी दिवसा — विशेषतः सकाळी ७ ते रात्री १० या वेळेत — अवजड वाहनांवर संपूर्ण बंदी घालण्याची मागणी सोसायटीधारकांकडून करण्यात येत आहे.**

# रावेत पंतप्रधान आवास योजना रद्द; एक कोटी 83 लाख 12 हजारांचे व्याज माफ

## पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने रावेत येथील पंतप्रधान आवास योजनेत आर्थिक दुर्बल घटकांसाठी गृहप्रकल्प उभारण्यात येणार होता

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने रावेत येथील पंतप्रधान आवास योजनेत आर्थिक दुर्बल घटकांसाठी गृहप्रकल्प उभारण्यात येणार होता. मात्र, मुदतीमध्ये प्रकल्प उभारणीस महापालिकेला अपयश आले. त्यामुळे तो प्रकल्प रद्द करण्यात आला. संबंधित ठेकेदाराने महापालिकेस नोटीस दिली होती. डीआरसी समितीच्या निर्णयानुसार ठेकेदाराकडून ॲडव्हास ४ कोटी ४१ लाख २५ हजार रूपयांची रक्कम महापालिका घेणार आहे. तर, त्या रक्कमेवरील तब्बल १ कोटी ८३ लाख ११ हजार ९०४ रूपये व्याज माफ केले जाणार आहे.

रावेत येथील दोन हेक्टर जागेत महापालिकेकडून पंतप्रधानस आवास योजना हा प्रकल्प राबविला जाणार होता. त्यासाठी फेब्रुवारी २०१९ ला स्थापत्य विभागाने निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. त्या गृहप्रकल्प बांधकामाचा कार्यारंभ आदेश ३० मे २०१९ ला देण्यात आला. या प्रकल्पासाठी एकूण ७९ कोटी ४६ लाख रुपये खर्चाचे काम मन इन्फ्रा कन्स्ट्रक्शनला देण्यात आले होते. तेथील इमारतीचे कामही सुरू करण्यात आले होते. मात्र, या प्रकल्पाविरोधात रावेत येथील एका व्यक्तीने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. पुणे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत झालेल्या भूसंपादनावर त्यांनी आक्षेप नोंदविला. उच्च न्यायालयाने कामास स्थगिती दिल्याने तेथील काम ऑक्टोबर २०२० पासून ठप्प झाले होते.

रावेत येथील पंतप्रधान आवास योजनेत आर्थिक दुर्बल घटकांसाठी 934 सदनिकांचा गृहप्रकल्प उभारण्यात येणार होता. ते काम मनाज इन्फ्रा कन्स्ट्रक्शनला 30 मे 2029 ला देण्यात आले होते. त्यासाठी 88 कोटी 25 लाख रुपये खर्च अपेक्षित होता. कामाची मुदत अडीच वर्षे होती. काम सुरू झाल्यानंतर काही महिन्यातच जागा ताब्यात घेण्याचा वाद उच्च न्यायालयात पोहोचल्याने न्यायालयाने 22 सप्टेंबर 2020 ला महापालिकेस काम बंद ठेवण्याचे आदेश दिले. त्या दिवसापासून ते काम ठप्प आहे. सर्वोच्च न्यायालयाने 1 ऑक्टोबर 2024 ला महापालिकेच्या बाजूने निकाल दिल्या. त्यात अधिक कालावधी गेला. प्रकल्प पूर्ण करण्याची मुदत डिसेंबर 2024 पर्यंत होती. मुदतीमध्ये प्रकल्प पूर्ण न झाल्याने महापालिकेवर तो प्रकल्प रद्द करण्याची नामुष्की ओढविली आहे.

हा प्रकल्प नव्याने राबविण्यात येणार असून, त्यासाठी महापालिका नव्याने निविदा प्रक्रिया राबविणार आहे. त्यामुळे संबंधित ठेकेदार महापालिकेच्या विरोधात उच्च न्यायालयात गेला होता. महापालिकेने ठेकेदाराला बांधकाम साहित्य व यंत्रसामुग्रीसाठी 4 कोटी 41 लाख 25 हजार रूपये ॲडव्हास दिले होते. त्यावरील 1 कोटी 83 लाख 11 हजार 904 रूपये व्याज माफ करावे, अशी मागणी केली होती.




### ९३४ नागरिकांच्या घराचे स्वप्न भंग

**» पिंपरी-चिंचवड सारख्या शहरात स्वतःचे घर असावे, असे प्रत्येकाचे स्वप्न असते. पण, जमिनीच्या वाढलेल्या किमती, खासगी गृहप्रकल्पातील सदनिकांच्या किमान ३० लाखांवर पोहोचलेल्या किमती, शिवाय, बँक गॅरंटी अशा विविध कारणांमुळे अनेकांचे घराचे स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे एक तर कुठे तरी झोपडी उभारून राहाणे किंवा भाडेतत्त्वावरील घरात राहावे लागत आहे. मात्र, रावेतमधील महापालिकेच्या पंतप्रधान आवास योजनेतील गृह प्रकल्प देखील रद्द झाल्याने तब्बल ९३४ नागरिकांच्या घराचे स्वप्न भंग झाले आहे. त्यामुळे घर मिळणार म्हणून आस लावून बसलेल्या लाभार्थ्यांना आणखी किती वर्ष घराची प्रतीक्षा करावी लागणार आहे..**

### रावेतमधील लाभार्थ्यांना किवळेत सदनिका

**» रावेत गृहप्रकल्पासाठी महापालिकेने 27 फेब्रुवारी 2021 ला सोडत काढली. नागरिकांकडून 5 हजार रूपये नोंदणी शुल्क घेतले. त्यांना अद्याप घरे मिळालेली नाही. तेथील लाभार्थ्यांना आता किवळे येथील 755 सदनिकेच्या गृहप्रकल्पातील सदनिका देण्यात येत आहेत. त्यासाठी लाभार्थ्यांना 7 लाखांऐवजी 13 लाख रुपये भरावे लागत आहेत. मात्र, किवळे प्रकल्पास अल्प प्रतिसाद असल्याचे चित्र आहे.**

# नोंदणीकृत डॉक्टरांसाठी क्यूआर कोड अनिवार्य

## यामुळे नागरिकांना डॉक्टरांची खरी ओळख, पात्रता आणि परवान्याची माहिती मोबाईलवरच सहज मिळणार आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्यात बोगस डॉक्टरांविरोधात कठोर कारवाईचा निर्णय घेत महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने (महाराष्ट्र मेडिकल काऊन्सिल) नोंदणीकृत डॉक्टरांसाठी क्यूआर कोडचा वापर अनिवार्य केला आहे. यासाठी 'नो युअर डॉक्टर' या प्रणालीचा वापर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे नागरिकांना डॉक्टरांची खरी ओळख, पात्रता आणि परवान्याची माहिती मोबाईलवरच सहज मिळणार आहे.

राज्यातील वाढलेल्या बोगस डॉक्टरांच्या वाढत्या प्रमाणावर विधानसभेतील चर्चेनंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. सरकारी आकडेवारीनुसार, गेल्या पाच वर्षांत 391 बोगस डॉक्टरांवर गुन्हे दाखल झाले असून, केवळ दोन आरोपींना शिक्षा झाली आहे, तर 17 जणांविरोधात आरोप सिद्ध झाले आहेत. कारवाई कठोर करण्यासाठी क्यूआर कोड प्रणाली तातडीने राबवली जाणार आहे. यासंबंधीचा आदेश दोन आठवड्यांत जारी केला जाईल. डॉक्टरांनी त्यांचे कोड असलेले कार्ड रुग्णालयांमध्ये प्रदर्शित करणे बंधनकारक केले जाणार आहे.

एमएमसीने 11 फेब्रुवारी 2025 रोजी हे व्यासपीठ सुरू केले होते. याद्वारे नागरिक कोणताही डॉक्टर नोंदणीकृत आहे का, त्याची पात्रता आणि विशेष क्षेत्र कोणती आहेत, या बाबी कोड स्कॅन करून तपासू शकतात. राज्यात सध्या दोन लाख नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिक असूनही, केवळ 10,000 डॉक्टरांनीच या सिस्टीममध्ये नावनोंदणी केली होती. आतापर्यंत नोंदणी ऐच्छिक होती. आता ती अनिवार्य करण्यात आली आहे.

बोगस डॉक्टरांविरोधात कठोर कारवाईचा निर्णय घेत महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने (महाराष्ट्र मेडिकल काऊन्सिल) नोंदणीकृत डॉक्टरांसाठी क्यूआर कोडचा वापर अनिवार्य केला आहे. यासाठी 'नो युअर डॉक्टर' या प्रणालीचा वापर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे नागरिकांना डॉक्टरांची खरी ओळख, पात्रता आणि परवान्याची माहिती मोबाईलवरच सहज मिळणार आहे. डॉक्टरांनी त्यांचे कोड असलेले कार्ड रुग्णालयांमध्ये प्रदर्शित करणे बंधनकारक केले जाणार आहे



> **क्यूआर कोड अनिवार्य करण्याचा निर्णय अत्यंत गरजेचा होता. यामुळे बोगस डॉक्टरांना आळा बसेल. प्रामाणिक डॉक्टरांवर नागरिकांचा विश्वास बसेल. या निर्णयामुळे वैद्यकीय सरावासाठी सकारात्मक पाऊल उचलल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे.**
>
> **- डॉ. सुनील इंगळे, अध्यक्ष, इंडियन मेडिकल असोसिएशन, पुणे**

# मुळशी तालुक्यात 1 ते 7 ऑगस्टदरम्यान 'महसूल सप्ताह'चे आयोजन

## नागरिकांनी लाभ घ्यावा, तहसीलदार विजयकुमार चोबे यांचे आवाहन

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या २९ जुलै २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार, नागरिकांना उत्कृष्ट सेवा प्रदान करण्याच्या उद्देशाने मुळशी तालुक्यासह संपूर्ण राज्यात १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत 'महसूल सप्ताह' आयोजित करण्यात येत आहे.

या सप्ताहाचा मुख्य उद्देश महसूल प्रशासनाशी संबंधित विविध योजना आणि सेवांचा लाभ थेट नागरिकांपर्यंत पोहोचवणे हा आहे. मुळशी तालुक्यातील सर्व नागरिक, शेतकरी, विद्यार्थी यांनी या सप्ताहात सक्रिय सहभाग घेऊन शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार विजयकुमार चोबे यांनी केले आहे.



### २ ऑगस्ट २०२५: अतिक्रमण नियमानुकूल करणे

» या दिवशी ग्रामीण आणि शहरी भागातील शासकीय जमिनीवरील १ जानेवारी २०११ पूर्वीच्या निवासी अतिक्रमणांना नियमानुकूल करून पात्र कुटुंबांना जागेचे पट्टे वाटप केले जाईल. यामुळे अनेक कुटुंबांना कायदेशीर मालकी हक्क मिळण्यास मदत होईल.

**३ ऑगस्ट २०२५: पाणंद रस्ते अतिक्रमणमुक्त-**

'पालकमंत्री शेत पाणंद रस्ते योजना' अंतर्गत शेत आणि पाणंद रस्त्यांवरील अतिक्रमणे हटवण्यासाठी विशेष मोहीम राबवली जाईल. अतिक्रमण हटवल्यानंतर रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेतला जाईल, ज्यामुळे पर्यावरण संवर्धनालाही चालना मिळेल.

**४ ऑगस्ट २०२५: छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान-**

प्रत्येक मंडळात महाराजस्व अभियान शिबिरे आयोजित केली जातील. या शिबिरांमधून नागरिकांना आधार कार्ड, जात, उत्पन्न, अधिवास यांसारखे आवश्यक दाखले आणि ओळखपत्रांचे वाटप केले जाईल. तसेच, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना मदतीचे प्रस्ताव तातडीने निकाली काढण्याची कार्यवाही केली जाईल.

**५ ऑगस्ट २०२५: विशेष सहाय्य योजना लाभार्थी मोहीम-**

विशेष सहाय्य योजनेतील ज्या लाभार्थ्यांचे थेट लाभ हस्तांतरण (DBT) झालेले नाही, अशा लाभार्थ्यांच्या घरी जाऊन DBT प्रक्रिया पूर्ण केली जाईल. तसेच, सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत शिधापत्रिकांची KYC पूर्ण करण्याची कार्यवाही केली जाईल.

**६ ऑगस्ट २०२५: शासकीय जमिनींचे संरक्षण –**

या दिवशी शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे काढली जातील. शर्तभंग झालेल्या जमिनींबाबत धोरणानुसार नियमानुकूल करणे किंवा त्या सरकारजमा करण्याचा निर्णय घेतला जाईल. कूळ कायद्यानुसार १० वर्षे पूर्ण झालेल्या शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावरील शर्तींचा शेरा कमी करण्याची प्रक्रिया राबवली जाईल.

**७ ऑगस्ट २०२५: M-SAND धोरण अंमलबजावणी व सप्ताह सांगता-**

कृत्रिम वाळू (M-SAND) धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी निश्चित कार्यप्रणालीनुसार कार्यवाही केली जाईल. सप्ताहाच्या यशस्वी कामगिरीचा आढावा घेण्यासाठी लोकप्रतिनिधी आणि नागरिकांच्या उपस्थितीत सांगता समारंभ आयोजित केला जाईल. या वेळी उल्लेखनीय कामगिरीची दखल घेतली जाईल.

### नागरिकांना लाभ घेण्याचे आवाहन

» महसूल सप्ताहात मुळशी तालुक्यातील नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ घेण्याची सुवर्णसंधी आहे. अतिक्रमण नियमानुकूल करणे, दाखले मिळवणे, शासकीय जमिनींचे संरक्षण, शेतकऱ्यांना मदत, आणि शिधापत्रिकांची KYC यांसारख्या विविध सुविधांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी या सप्ताहात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे तहसीलदार विजयकुमार चोबे यांनी आवाहन केले आहे.

### १ ऑगस्ट २०२५: महसूल सप्ताहाचा शुभारंभ

» महसूल सप्ताहाचा प्रारंभ १ ऑगस्ट रोजी होणार असून, यानिमित्ताने कार्यरत आणि सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधला जाईल. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा गौरव केला जाईल. तसेच, लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्रांचे वाटप होईल. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम १५५ अंतर्गत प्रकरणे 'ई-हक्क' पोर्टलद्वारे स्वीकारली जातील.

# उरुळी कांचन येथे 100 हेक्टरवर रेल्वेचे मेगा टर्मिनल..

## नवीन रेल्वेमार्गांच्या योजनांमुळे उरुळी कांचन परिसरात आर्थिक उलाढाल आणि गुंतवणुकीला मोठ्या प्रमाणात चालना : उपमुख्यमंत्री अजित पवार

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे-सोलापूर लोहमार्गाचे विद्युतीकरण, महामार्गाचे रुंदीकरण, तसेच पुणे शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी आखण्यात आलेल्या नवीन रेल्वेमार्गांच्या योजनांमुळे उरुळी कांचन परिसरात आर्थिक उलाढाल आणि गुंतवणुकीला मोठ्या प्रमाणात चालना मिळत आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, पुणे ते अहिल्यानगर या प्रस्तावित नवीन रेल्वेमार्गासाठी तळेगाव ते उरुळी कांचन या 75 किमी मार्गात उरुळी कांचन येथे 100 हेक्टरवर मेगा रेल्वे टर्मिनल उभारण्यात येणार आहे.

हा रेल्वेमार्ग तळेगाव, चाकण, आळंदी, वाघोली, शिक्रापूर, रांजणगाव, सुपे, चास आणि अहिल्यानगर अशा आठ स्थानकांद्वारे जोडला जाणार असून, चाकण व रांजणगावसारख्या औद्योगिक पट्ट्यांना त्यामुळे विशेष फायदा होणार आहे. या प्रकल्पाच्या अनुषंगाने लवकरच भूसंपादनास सुरुवात होणार आहे. शेतकऱ्यांना न्याय्य मोबदला दिला जाईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री पवार यांनी यावेळी दिली.या कामामुळे पुणे परिसरातील वाहतूक कोंडी सुटण्यास मोठी मदत होणार असून, दोन नवे रिंगरोड्स आणि प्रस्तावित विमानतळाच्या पार्श्वभूमीवर उरुळी कांचन, शिक्रापूर, लवळे, पेरणे आणि आसपासच्या गावांमध्ये व्यावसायिक व औद्योगिक संधी मोठ्या प्रमाणात वाढणार आहेत.

संपादित करण्यात येणार्या जमिनीच्या मोबदल्यात शेतकर्यांना योग्य तो दर दिला जाणार असून, यासंदर्भात जिल्हाधिकार्यांना निर्देश देण्यात आले आहेत. तसेच हा मार्ग सोलापूर मार्गाला जोडण्यात येणार असून त्यासाठी भूसंपादन करण्यात यावे, असा प्रस्ताव रेल्वे मंत्रालयाने दिला आहे. हे काम पुढील चार वर्षांत पूर्ण करण्यात येणार असून यासाठी तळेगाव येथे न्यू तळेगाव व उरुळी कांचन येथे नवीन स्टेशन उभारले जाणार आहेत.



### लहान-मोठ्या व्यवसायांना चालना

» प्रस्तावित विमानतळ, रिंगरोड व रेल्वे टर्मिनलमुळे गावागावांत गोदाम, मालधक्के, इतर व्यवसाय सुरू होण्यास संधी निर्माण होणार आहे. परिणामी रोजगार निर्मिती वाढणार, तर जमिनींच्या खरेदी-विक्रीतून महसूलात मोठी वाढ अपेक्षित आहे. 10 ते 25 किमी अंतरातील सर्वच गावांमध्ये गुंतवणूकदारांचा ओघ वाढण्याची शक्यता आहे.

> "आर्थिक उलाढाल आणि गुंतवणुकीला मोठ्या प्रमाणात चालना मिळत आहे उरुळी कांचनची बाजारपेठ ही तीन तालुक्यात प्रसिद्ध व विश्वासार्ह मानली जाते. प्रस्तावित विमानतळ अवघ्या 10 किमी अंतरावर, आणि नव्याने उभारले जाणारे रेल्वे टर्मिनल 100 हेक्टरवर होणार असल्याने परिसरातील आर्थिक उलाढाल प्रचंड प्रमाणात वाढेल. हे उरुळी कांचनसह परिसरातील नागरिकांसाठी अत्यंत आनंदाचे आहे".
>
> \- ऋतुजा कांचन, सरपंच, उरुळी कांचन (ता. हवेली)